**<u>आरबीआय/२००७-०८/३४</u>**

आरपीसीडी.क्र. प्लॅन.बीसी ५/०४.०९.०१/२००७-२००८

जुलै २, २००७

**अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी**

**(सर्व अनुसूचित व्यावसायिक बँका**
**(विभागीय ग्रामीण बँका वगळून))**

माननीय महोदय,

**महापरिपत्रक –प्राधान्य क्षेत्रात कर्ज देणे**

भारतीय रिझर्व्ह बँकेने, वेळोवेळी, प्राधान्य क्षेत्राला कर्ज देण्यावर अनेक मार्गदर्शक तत्त्वांचे/सूचनांचे/आदेशांचे निर्गमन केले आहे. बँकांना चालू सूचना एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने, या विषयावरील विद्यमान मार्गदर्शक तत्त्वे/सुचना/आदेश अंतर्भूत केलेले एक महापरिपत्रक तयार करण्यात आले आहे आणि सोबत जोडण्यात आले आहे. या महापरिपत्रकात रिझर्व्ह बँकेने, परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे या विषयावर जून ३०, २००७ पर्यंत निर्गमित केलेली सर्व परिपत्रके एकत्रित करण्यात आली आहेत.

कृपया पोंच द्यावी.

आपला विश्वासू,

**(जी. श्रीनिवासन.)**
**मुख्य महाव्यवस्थापक**

# <u>प्राधान्य क्षेत्राला कर्ज देणे</u>

जुलै १९६८ मध्ये घेण्यात आलेल्या नॅशनल क्रेडीट कौंसिलच्या सभेत, व्यावसायिक बँकांनी प्राधान्य क्षेत्राला म्हणजे शेती आणि लघु उद्योग यांना वित्तपुरवठा करण्यातील आपला सहभाग वाढविला पाहिजे गोष्टीवर भर देण्यात आला होता. त्यानंतर रिझर्व्ह बँकेने मे १९७१ मध्ये स्थापित केलेल्या प्राधान्य क्षेत्राला अग्रिमांच्या संबंधातील आंकडेवारीवरील अनौपचारिक अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे १९७२ मध्ये प्राधान्य क्षेत्राचे वर्णन निश्चित करण्यात आले. या अहवालाच्या आधारे, रिझर्व्ह बँकेने प्राधान्य क्षेत्राला अग्रिमांचा अहवाल देण्यासाठी सुधारित विवरणपत्र विहीत केले होते आणि या संबंधात प्राधान्य क्षेत्राच्या विविध प्रवर्गांखाली समाविष्ट करण्यासाठी बाबींची व्याप्ती दर्शविणारी काही मार्गदर्शक तत्त्वेहि निर्गमित करण्यात आली होती. सुरवातीला जरी प्राधान्य क्षेत्रातील कर्जांसाठी विशिष्ट लक्ष निश्चित करण्यात आले नव्हते, नोव्हेंबर १९७४ मध्ये बँकाना या क्षेत्रातील त्यांचा हिस्सा मार्च १९७९ पर्यंत त्यांच्या एकूण अग्रिमांच्या ३३-१/३ टक्क्यांच्या पातळीपर्यंत वाढविण्याचा सल्ला देण्यात आला होता.

मार्च १९८० मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांबरोबर केंद्रीय वित्त मंत्र्यांच्या झालेल्या सभेत, हे मान्य करण्यात आले कि बँकानी मार्च १९८५ पर्यंत प्राधान्य क्षेत्रातील त्यांच्या कर्जांचे प्रमाण ४० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे लक्ष्य ठेवावे. त्यानंतर, प्राधान्य क्षेत्रातील कर्ज देण्याच्या आणि २० कलमी आर्थिक कार्यक्रमाच्या बँकानी करायच्या अंमलबजावणीवरील कार्यकारी गटाच्या(अध्यक्षः डॉ. के.एस.कृष्णास्वामी) शिफारशीच्या आधारे, सर्व व्यावसायिक बँकांना त्यांनी प्राधान्य क्षेत्राला कर्ज त्यांच्या एकूण अग्रिमांच्या ४० टक्क्यापर्यंत नेण्याचे लक्ष्य १९८५ पर्यंत गाठावे असा सल्ला देण्यात आला होता. प्राधान्य क्षेत्राच्या अंतर्गत शेती आणि कमकुवत गटांना कर्ज देण्यासाठी उपलक्ष्येहि विनिर्दिष्ट करण्यात आली होती. तेव्हापासून प्राधान्य क्षेत्रातील कर्जांच्या व्याप्तीत आणि विविध बँक गटांना लागू होणारी लक्ष्ये आणि उपलक्ष्ये यात अनेक बदल झाले आहेत.
प्राधान्य क्षेत्र निर्माण करणारे विभाग, लक्ष्ये आणि उपलक्ष्ये, वगैरे आणि बँका, वित्तीय संस्था, जनता आणि इंडियन बँकस् असोशिएशन (आयबीए) यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचना/ भाष्ये यासह प्राधान्य क्षेत्राला कर्जे देण्यातील विद्यमान धोरणावर, काही असल्यास, बदल तपासण्यासाठी, आढावा घेण्यासाठी आणि शिफारस करण्यासाठी रिझर्व्ह बँकेत स्थापन करण्यात आलेल्या अंतर्गत कार्यकारी गटाने (अध्यक्ष ः श्री सी. एस. मूर्ती) सप्टेंबर २००५ मध्ये केलेल्या शिफारशिंच्या आधारे, असा निर्णय घेण्यात आला कि लोकसंख्येच्या मोठ्या भागावर, कमकुवत गटांवर प्रभाव पाडणाऱ्या आणि शेती, आणि लघु आणि लहान उद्यम अशा रोजगार-क्षम क्षेत्रांना प्राधान्य क्षेत्रात समाविष्ट करण्यात यावे.

**सद्यस्थितीत, सर्व व्यावसायिक बँकांसाठी प्राधान्य क्षेत्राचे साधारणपणे प्रवर्ग खालीलप्रमाणे आहेतः**

**१. प्राधान्य क्षेत्राचे प्रवर्ग**

**(१) शेती (प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष वित्तपुरवठा)**ः शेतीला प्रत्यक्ष वित्तपुरवठ्यात शेतकऱ्यांना व्यक्तिशः थेट. स्व-मदत गट(एसएचजीज) किंवा व्यक्तिगत शेतकऱ्यांचे संयुक्त दायित्वे

गट(जेएलजीज) यांना शेती आणि संलग्न कार्ये हाती घेण्यासाठी कोणत्याहि मर्यादेविना दिलेली आणि इतरांना कलम १ मध्ये निर्देशित मर्यादेच्या अंतर्गत शेती आणि संलग्न कार्ये हाती घेण्यासाठी अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदत कर्जे समाविष्ट आहेत. शेतीला अप्रत्यक्ष कर्जात जोडलेल्या कलम १ मध्ये विनिर्दिष्टीत केल्याप्रमाणे शेती/संलग्न कार्ये यासह शेतीला दिलेल्या कर्जांचा समावेश असेल.

(२) **छोटे उद्यम (प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष वित्तपुरवठा)ः** छोट्या उद्यमांना प्रत्यक्ष वित्तपुरवठ्यात, उत्पादन/निर्मिती, मालाची प्रक्रिया किंवा संवर्धन यात व्यस्त असलेल्या मायक्रो आणि लघु (निर्मिती)उद्योगांना, आणि सेवा देण्यात किंवा पुरवण्यात व्यस्त असणाऱ्या मायक्रो आणि लघु उद्योगांना, ज्यांची संयंत्र आणि यंत्रसामग्रीतील आणि उपकरणातील (त्यात नमूद केल्याप्रमाणे जमीन आणि इमारत आणि तशाच अन्य बाबींची मूळ किंमत धरून) गुंतवणूक अनुक्रमे, जोडलेल्या कलम १ मध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या रकमेच्या बाहेर नाही, दिलेली सर्व कर्जे लघु उद्योगांना प्रत्यक्ष वित्तपुरवठ्यात समाविष्ट असतील. मायक्रो आणि लघु(सेवा) उद्योगात लहान रस्ते आणि जल वाहतूक प्रचालक, छोटे व्यवसाय, व्यावसायिक आणि स्वयंरोजगारी व्यक्ति, आणि जोडलेल्या कलम १ मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार सर्व अन्य सेवा उद्योग यांचा समावेश असेल.

लघु उद्योगांना अप्रत्यक्ष वित्तपुरवठ्यात कारागीर, खादी आणि ग्रामीण उद्योग, हातमाग यांच्या उत्पन्नासाठी निविष्टीचा पुरवठा करणाऱ्या आणि त्यांचे विपणन करणाऱ्या कोणत्याहि व्यक्तिला आणि या क्षेत्रातील उत्पादकांच्या सहकारी संस्थांना केलेला वित्तपुरवठा समाविष्ट असेल

(३) **किरकोळ व्यापारात** अत्यावश्यक वस्तूत व्यवहार करणारे किरकोळ व्यापारी/खाजगी किरकोळ व्यापारी(उचित दर दुकान) आणि जोडलेल्या कलम १ मध्ये दिल्याप्रमाणे ग्राहक सहकारी संस्था यांचा समावेश असेल.

(४) **मायक्रो क्रेडीटः** एसएचजी/जेएलजी यंत्रणेमार्फत, क्रेडीट आणि अन्य वित्तीय सेवा आणि प्रति ऋणको रु. ५०,००० च्या पुढे न जाणारी अतिशय छोट्या रकमाची उत्पादने यांची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष तरतूद, किंवा एनबीएफसी/एमएफआय यांना प्रति ऋणको रु. ५०,००० पर्यंत पुढे कर्ज देण्यासाठी तरतूद यांनी मायक्रो क्रेडीट होईल.

(५) **शैक्षणिक कर्जः** शैक्षणिक कर्जात केवळ व्यक्तिंना शैक्षणिक हेतूने भारतातील अभ्यासासाठी रु. १० लाखापर्यंत आणि विदेशातील अभ्यासासाठी रु. २० लाखापर्यंत मंजूर केलेली कर्जे आणि अग्रिमे समाविष्ट असतील, आणि त्यात संस्थांना मंजूर केलेली समाविष्ट नसतील,

(६) **गृहनिर्माण कर्जेः** प्रति कुटुंब निवास स्थानाच्या खरेदी/बांधणीसाठी व्यक्तिना रु. २० लाखापर्यंत, (बँकानी त्यांच्या स्वतःच्या कर्मचाऱ्यांना मंजूर केलेली कर्जे वगळून) आणि कुटुंबाच्या पडझड झालेल्या निवासस्थानाच्या दुरुस्तीसाठी ग्रामीण आणि अर्धनागरी क्षेत्रात रु. १ लाखापर्यंत आणि नागरी आणि महानगरी क्षेत्रात रु. २ लाखापर्यंत दिलेली कर्जे.

**२. ह्या मार्गदर्शक तत्त्वांची अन्य वैशिष्ट्ये**

(१) प्राधान्य क्षेत्रातील विविध प्रवर्गाला कर्जाचे प्रतिनिधीत्व करणारी बँकांची प्रतिभूत मत्तेतील गुंतवणूक, प्रतिभूत मत्ता बँका आणि वित्तीय संस्थांतून उद्‌भूत असतील आणि

प्रतिभूतीकरणावरील आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करीत असतील तर त्याखाली येणाऱ्या मत्तांच्या आधारे प्राधान्य क्षेत्राच्या(प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष) संबंधित प्रवर्गाखाली वर्गीकरणासाठी पात्र असतील. ह्याचा अर्थ असा असेल कि प्रतिभूत मत्तांच्या उक्त प्रवर्गातील बँकांची गुंतवणूक, जर प्रतिभूत अग्रिमे त्यांच्या प्रतिभूतीकरणापूर्वी प्राधान्य क्षेत्र अग्रिमे म्हणून वर्गीकरणास पात्र असतील तरच प्राधान्य क्षेत्राच्या संबंधित प्रवर्गाखाली वर्गीकरणास पात्र असतील.

(२) प्राधान्य क्षेत्राखाली वर्गीकरणासाठी पात्र होणारी कोणतीहि कर्जाऊ मत्ता, जर घेतलेली कर्जे प्राधान्य क्षेत्राखाली वर्गीकरणास पात्र असतील, कर्जाऊ मत्ता (योग्य त्या सावधानतेनंतर आणि रास्त मूल्याने) विक्रेत्याच्या कोणत्याहि अवलंबाविना बँका आणि वित्तीय संस्थांकडून खरेदी केलेली असेल आणि पात्र कर्जाऊ मत्तेची, खरेदीच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, परतफेडीशिवाय अन्य कोणत्याहि मार्गाने विल्हेवाट लावली नसेल तर खरेदी केलेले कर्ज प्राधान्य क्षेत्राखाली वर्गीकरणास पात्र असेल.

(३) जोखीम सहभाग तत्त्वावरील, बँकांची इंटर बँक पार्टीसिपेशन सर्टिफिकेटस् (आयबीपीसीज) मधील गुंतवणूक प्राधान्य क्षेत्राखालील संबंधित प्रवर्गात वर्गीकरणास पात्र असेल जर, त्याखाली येणाऱ्या मत्ता संबंधित प्रवर्गाखाली वर्गीकरणास पात्र असतील आणि गुंतवणूकीच्या तारखेपासून किमान १८० दिवस धारण केलेल्या असतील.

(४) प्राधान्य क्षेत्राला कर्जाखालील लक्ष्ये आमि उपलक्ष्ये ॲडजस्टेड नेट बँक क्रेडीट (एएनबीसी)(नेट बँकिंग क्रेडीट अधिक एचटीएम प्रवर्गात धारण केलेल्या नॉ-एसएलआर रोख्यात बँकानी केलेली गुंतवणूक) किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजर (ओबीइ) यापैकी आधीच्या वर्षाच्या मार्च ३१ रोजी असल्याप्रमाणे जे अधिक असेल त्याच्याशी संलग्न केली जातील. प्राधान्य क्षेत्राला कर्जाच्या हेत्वर्थ हिशोब करण्यासाठी यापुढे थकित एफसीएनआर(बी) आणि एनआरएनआर ठेवींच्या शिलकी वजा केल्या जाणार नाहीत.

ह्या हेतूने भारत सरकारने बाजारात आणलेल्या रिकॅपिटलायझेशन रोख्यात बँकानी केलेली गुंतवणूक धरली जाणार नाही. एप्रिल ३०, २००७ पर्यंत असल्याप्रमाणे, एचटीएम प्रवर्गात धारण केलेल्या नॉन-एसएलआर रोख्यात बँकानी केलेली विद्यमान गुंतवणूक, मार्च ३१, २०१० पर्यंत एएनबीसीचा हिशोब करण्यासाठी धरली जाणार नाही. तथापि, ह्या हेत्वर्थ, एचटीएम प्रवर्गात धारण केलेल्या नॉन-एसएलआर रोख्यात केलेली नवीन गुंतवणूक धरण्यात येईल. प्राधान्य क्षेत्राला कर्जाची लक्ष्ये आणि उपलक्ष्ये पूर्ण न केल्याबद्दल, बँकानी नाबार्ड/सिडबी, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, यांच्याकडे ठेवलेल्या ठेवी, जरी ताळेबंद पत्रकात 'गुंतवणूक' खाली बाब १

(५) - 'अन्य' वर परिशिष्ट ८ अधीन दाखवल्या असल्या तरी, एचटीएम प्रवर्गाखाली धारण केलेल्या नॉन-एसएलआर रोख्यातील गुंतवणूक समजण्यात येणार नाहीत. ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजर्सच्या समकक्ष क्रेडीटच्या हिशोबासाठी बँका चालू एक्स्पोजर पद्धतीचा वापर करू शकतात. प्राधान्य क्षेत्राला कर्जांची लक्ष्ये/उपलक्ष्ये यांच्या हेत्वर्थ इंटर-बँक एक्स्पोजर्स धरली जाणार नाहीत.

(५) एप्रिल ३०, २००७ रोजी किंवा नंतर प्राधान्य क्षेत्राला कर्जेंची लक्ष्ये/उपलक्ष्ये प्राप्त न केल्याबद्दल नाबार्ड/सिडबी यांच्याकडे ठेवलेल्या नवीन ठेवी शेती/लघु उद्योग क्षेत्र याना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वित्तपुरवठा, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, म्हणून धरल्या जाणार नाहीत. परंतु, बँकानी नाबार्ड/सिडबी यांच्याकडे उक्त खाती ठेवलेल्या आणि एप्रिल ३०, २००७ रोजी थकित असलेल्या ठेवी, अशा ठेवींची मुदत पूर्ती किंवा मार्च ३१, २०१०, यापैकी आधी असेल तोपर्यंत शेती/लघु उद्योग क्षेत्राला, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, अप्रत्यक्ष वित्तपुरवठा म्हणून वर्गीकरणाला पात्र असतील.

### ३. लक्ष्ये/उपलक्ष्ये

स्थानिक आणि भारतात प्रचालन करणाऱ्या विदेशी बँकांसाठी प्राधान्य क्षेत्राला कर्जे देण्याअधीन ठरवलेली लक्ष्ये आणि उपलक्ष्ये खाली दिली आहेतः

| | **स्थानिक व्यावसायिक बँका** | **विदेशी बँका** |
|---|---|---|
| **एकूण प्राधान्य क्षेत्र अग्रिमे** | ॲडजस्टेड नेट बँक क्रेडीट (एएनबीसी) च्या ४०% किंवा ऑफ-बँलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य रकमेचे क्रेडीट यापैकी जे अधिक असेल | ॲडजस्टेड नेट बँक क्रेडीट (एएनबीसी) च्या ३२% किंवा ऑफ-बँलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य रकमेचे क्रेडीट यापैकी जे अधिक असेल |
| **एकूण शेती अग्रिमे** | एएनबीसीच्या १८% किंवा ऑफ-बँलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य रकमेचे क्रेडीट यापैकी जे अधिक असेल<br>यापैकी एएनबीसीच्या ४.६% पेक्षा अधिक अप्रत्यक्ष कर्ज किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य रकमेचे क्रेडीट यापैकी जे अधिक असेल, ते १८% च्या लक्ष्याच्या खालील कार्याचा हिशोब करण्यासाठी मान्य जाणार नाही. परंतु 'प्रत्यक्ष' आणि 'अप्रत्यक्ष' प्रवर्गाखालील सर्व शेती अग्रिमे एएनबीसीच्या ४० टक्के किंवा ऑफ-बँलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य रकमेचे क्रेडीट यापैकी जे अधिक असेल त्याचा हिशोब करण्यासाठी मान्य केले जाईल. | कोणतेहि लक्ष्य नाही |
| **लघु उद्योग अग्रिमे** | एएनबीसीच्या ४० टक्के किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य रकमेचे क्रेडीट यापैकी जी अधिक असतील ती लघु उद्योग क्षेत्राला अग्रिमे एकूण प्राधान्य क्षेत्र लक्ष्याखालील कार्याचा हिशोब करण्यासाठी मान्य करण्यात येईल | एएनबीसीच्या १० टक्के किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य रकमेचे क्रेडीट यापैकी जे अधिक असेल |
| **लघु उद्योग क्षेत्रांतर्गत मायक्रो उद्योग** | (१) लघु उद्योग क्षेत्रातील एकूण अग्रिमांच्या ४० टक्के संयंत्रे आणि यंत्रसामग्री यात रु. ५ लाखापर्यंत गुंतवणूक असणाऱ्या मायक्रो (उत्पादन) उद्योगाना आणि उपकरणात रु. २ लाखापर्यंत गुंतवणूक अृसणाऱ्या मायक्रो (लेवा) उद्योगाना जावी, | स्थानिक बँकांप्रमाणेच |

| | | |
|---|---|---|
| | (२) लघु उद्योग क्षेत्रातील एकूण अग्रिमांच्या २० टक्के संयंत्रे आणि यंत्रसामग्री यात रु. ५ लाखाच्यावर आणि रु. २५ लाखापर्यंत गुंतवणूक असणाऱ्या मायक्रो (उत्पादन) उद्योगाना आणि उपकरणात रु. २ लाखाच्यावर आणि रु. १० लाखापर्यंत गुंतवणूक असणाऱ्या मायक्रो (लेवा) उद्योगाना जावी, (अशा प्रकारे लघु उद्योगाला अग्रिमांपैकी ६० टक्के मायक्रो उद्योगाना जावी.) | |
| **निर्यात क्रेडीट** | स्थानिक व्यावसायिक बँकांसाठी निर्यात क्रेडीट हे प्राधान्य क्षेत्राचा भाग नाही. | एएनबीसीच्या १२ टक्के किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य रकमेचे क्रेडीट यापैकी जे अधिक असेल |
| **दुर्बळ घटकांना अग्रिमे** | एएनबीसीच्या १० टक्के किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य रकमेचे क्रेडीट यांपैकी जे अधिक असेल | कोणतेहि लक्ष्य नाही |
| **भेददर्शी व्याज दर योजना** | आधीच्या वर्षाच्या अखेरीला थकित असल्याप्रमाणे अग्रिमांच्या १ टक्का. डीआरआय योजनेखाली मंजूर केलेल्या एकूण अग्रिमांपैकी अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातींना जाणारी अग्रिमे ४० टक्क्यांपेक्षा कमी असणार नाहीत याची खात्री करावी. डीआरआय अग्रिमांपैकी किमान दोन तृतीयांश ग्रामीण आणि अर्ध नागरी शाखांमार्फत मंजूर केली जावीत. | कोणतेहि लक्ष्य नाही. |

**[एएनबीसी किंवा ऑफबॅलन्स शीट एक्स्पोजर्सचा (भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग प्रचालन आणि विकास विभागाने केलेल्या व्याख्येप्रमाणे) आधीच्या वर्षाच्या अखेरीला असल्याप्रमाणे थकित रकमेचा संदर्भ घेऊन हिशोब केला जाईल. ह्या हेतूने, थकित एफसीएनआर(बी) आणि एनआरएनआर ठेवी शिलकी यापुढे प्राधान्य क्षेत्राला कर्जाचा हिशोब करण्याच्या हेतूने एएनबीसीच्या हिशोबासाठी वजा केल्या जाणार नाहीत. बँकांनी एटीएम प्रवर्गात धारण केलेल्या नॉन-एसएलआऱ रोख्यात केलेली एनबीसी प्लस गुंतवणूक एएनबीसी दर्शवते. भारत सरकारने आणलेल्या रिकॅपिटलायझेशन रोख्यात बंकानी केलेली गुंतवणूक एएनबीसी चा हिशोब करण्यासाठी धरली जाणार नाही. ह्या परिपत्रकाच्या तारखेला असल्याप्रमाणे, बँकांनी एचटीएम प्रवर्गात धारण केलेल्या नॉन-एसएलआर रोख्यात केलेली विद्यमान गुंतवणूक मार्च**

**३१, २०१० पर्यंत एएनबीसीचा हिशोब करण्यासाठी धरली जाणार नाही. परंतु बँकांनी एचटीएम प्रवर्गात धारण केलेल्या नॉन-एसएलआर रोख्यात केलेली नवीन गुंतवणूक ह्या हेतूसाठी धरली जाईल. प्राधान्य क्षेत्राला कर्जाची लक्ष्ये आणि उपलक्ष्ये पूर्ण न केल्याबद्दल, बँकांनी नाबार्ड/सिडबी, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, यांच्याकडे ठेवलेल्या ठेवी, जरी ताळेबंद पत्रकात 'गुंतवणूक' खाली बाब १ (५) - 'अन्य' वर परिशिष्ट ८ अधीन दाखवल्या असल्या तरी, एचटीएम प्रवर्गाखाली धारण केलेल्या नॉन-एसएलआर रोख्यातील गुंतवणूक समजण्यात येणार नाहीत. ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजर्सच्या समकक्ष क्रेडीटच्या हिशोबासाठी बँका चालू एक्स्पोजर पद्धतीचा वापर करू शकतात. प्राधान्य क्षेत्राला कर्जांची लक्ष्ये/उपलक्ष्ये यांच्या हेत्वर्थ इंटर-बँक एक्स्पोजर्स धरली जाणार नाहीत.]**

ह्या बाबतीतील सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे येथे खाली दिली आहेत.

**खंड १**

| | | |
|---|---|---|
| **१.** | **शेती** | |
| | | |
| **प्रत्यक्ष वित्तपुरवठा** | | |
| | | |
| **१.१** | व्यक्तिगत शेतकऱ्यांना शेती आणि संलग्न कार्यासाठी(दुग्धोत्पादन, मत्स्योत्पादन, वराह पालन, कुक्कुट पालन, मधमाशापालन वगैरे) वित्तपुरवठा (स्वमदत गट (एसएचजीज) किंवा संयुक्त दायित्वे गट (जेएलजीज), म्हणजेच व्यक्तिगत शेतकऱ्यांचे गट, जर बँकेने अशा वित्तपुरवठ्यावरील एकूणात केलेला डेटा ठेवला असेल) | |
| | | |
| | **१.१.१** | पिके काढण्यासाठी अल्पमुदत कर्जे, म्हणजेच पीक कर्जे. ह्यात पारंपरिक अ-पारंपरिक लागवड आणि बागायतीचा समावेश असेल. |
| | | |
| | **१.१.२** | शेतकऱ्याला पीक काढण्यासाठी कर्ज दिले होते अथवा नाही हे विचारात न घेता १२ महिन्यापेक्षा अधिक नसलेल्या काळासाठी शेती मालाचे उत्पादन गहाण/तारण ठेवण्यासमक्ष रु. १० लाखांपर्यंत अग्रिमे. |
| | | |
| | **१.१.३** | शेती आणि संलग्न कार्यांसाठी उत्पादक आणि गुंतवणूकीच्या गरजाच्या वित्तपुरवठ्यासाठी खेळते भांडवल आणि मुदत कर्जे. |
| | | |
| | **१.१.४** | शेतीच्या हेतूने जमीन खरेदी करण्यासाठी लहान आणि मार्जिनल शेतकऱ्याना कर्जे. |
| | | |
| | **१.१.५** | बिगर संस्थात्मक कर्जदारांचे देणेकरी असलेल्या अडचणीतील शेतकऱ्यांना उचित सांपार्श्विक आणि गट सुरक्षेसमक्ष कर्जे. |
| | | |
| | **१.१.६** | फवारणी, तण काढणे, कापणी, श्रेणीकरण, निवडणे, प्रक्रिया करणे आणि वाहतूक करणे अशा व्यक्तिगत, एसएचजीज आणि ग्रामीण भागातील सहकारी संस्थांनी हाती घेतलेल्या पीक-पूर्व आणि पीक-पश्चात कार्यांसाठी कर्जे. |
| | | |
| १.२ | **इतरांना(कॉर्पोरेटस्, भागीदारी फर्मस् आणि संस्था अशा) शेती आणि संलग्न कार्यासाठी (दुग्धोत्पादन, मत्स्योत्पादन, वराह पालन, कुक्कुट पालन, मधमाशा पालन वगैरे ) साठी वित्तपुरवठा.** | |
| | | |
| | **१.२.१** फवारणी, तण काढणे, कापणी, श्रेणीकरण, निवडणे आणि वाहतूक अशा पीकपूर्व आणि पीकपश्चात कार्यांसाठी मंजूर केलेली कर्जे. | |
| | **१.२.२** उक्त १.१.१, १.१.२, १.१.३ आणि १.२.१ वर सूचिबद्ध केलेल्या हेतूंसाठी | |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रति ऋणको एकूण रु. एक कोटीपर्यंतच्या रकमेसाठी वित्तपुरवठा. | | |
| | **१.२.३** शेती आणि संलग्न कार्यांसाठी प्रति ऋणको रु. एक कोटीच्या बाहेरील एकूण कर्जांच्या एकतृतीयांश. | | |
| | | | |
| अप्रत्यक्ष वित्तपुरवठा | | | |
| १.३ | शेती आणि संलग्न कार्यांसाठी वित्तपुरवठा | | |
| | | | |
| | १.३.१ उक्त १.२ खाली येणाऱ्या एककांना शेती आणि संलग्न कार्यांसाठी प्रति ऋणको एकूण रु. एक कोटींच्या बाहेरील कर्जांपैकी दोनतृतीयांश. | | |
| | | | |
| | १.३.२ उक्त १.१.६ वरील व्यातिरिक्त इतरांनी हाती घेतलेल्या, यंत्रसामग्री आणि संयंत्रात रु. १० कोटीपर्यंत गुंतवणूक असलेल्या अन्न आणि शेती-आधारित उद्योगांना कर्जे. | | |
| | | | |
| | **१.३.३** | (१) | खते, कीटकनाशके, बियाणे वगैरेंच्या खरेदी आणि वितरणासाठी क्रेडीट. |
| | | (२) | पशुखाद्य, कुक्कुट खाद्य, वगैरेसारख्या शेती आणि संलग्न कार्यांसाठी निविष्टीच्या खरेदी आणि वितरणासाठी मंजूर केलेली रु. ४० लाखांपर्यंतची कर्जे. |
| | **१.३.४** | ॲग्रीक्लिनिक्स आणि ॲग्रीबिझीनेस केंद्रे स्थापन करण्यासाठी वित्तपुरवठा. | |
| | | | |
| | **१.३.५** | शेती यंत्रसामग्री आणि उपकरणे यांच्या वितरणासाठी भाडेखरेदी योजनांसाठी वित्तपुरवठा. | |
| | | | |
| | **१.३.६** | प्रायमरी ॲग्रीकल्चरल सोसायटीज(पीएसीएस), फार्मर्स सर्व्हिस सोसायटीज(एफएसएस) आणि मोठ्या आकाराच्या अदिवासी मल्टी-परपज सोसायटीज (एलएएमपीएस) मार्फत शेतकऱ्याना कर्जे. | |
| | | | |
| | **१.३.७** | शेतकऱ्यांच्या सहकारी सोसायट्याना सदस्यांच्या उत्पादनाच्या विल्हेवाटीसाठी कर्जे. | |
| | | | |
| | **१.३.८** | सहकारी यंत्रणेमार्फत शेतकऱ्याना(रोखे आणि कर्जरोखे यातील अंशदानाव्यतिरिक्त) अप्रत्यक्ष वित्तपुरवठा करणे. | |
| | | | |
| | **१.३.९** | केवळ शेती/संलग्न कार्याना वित्तपुरवठा करण्याच्या हेतूने नाबार्डने निर्गमित केलेल्या विशेष रोख्यात बँकानी केलेली मार्च ३१, रोजी असल्याप्रमाणे विद्यमान गुंतवणूक, असा रोख्यांची मुदतपूर्तीची तारीख किंवा मार्च ३१, २०१०, यापैकी जे आधी असेल तोपर्यंत शेतीला अप्रत्यक्ष वित्तपुरवठा म्हणून वर्गीकृत करता येईल. तथापि मार्च ३१, २००७ नंतर अशा विशेष रोख्यात केलेली नवीन गुंतवणूक अशा वर्गीकरणासाठी पात्र नसेल. | |

| | | |
|---|---|---|
| | | |
| | १.३.१० | शेती उत्पादने / उपज साठविण्यासाठी रचना केलेल्या शीतगृहांसह साठविण्याच्या सुविधांच्या (वेअरहाऊसेस, मार्केट यार्डस्, गोदामे, आणि सिलोस वगैरे) उभारणी आणि प्रचालनासाठी, त्यांच्या ठिकाणांचा विचार न करता, कर्जे. |
| | | |
| | | जर साठा करणारे युनीट एसएसआय युनीट/मायक्रो किंवा लघु उद्योग म्हणून नोंदणीकृत असेल, तर मंजूर केलेली कर्जे लघु उद्योग क्षेत्राला कर्जे म्हणून वर्गीकृत करता येतील. |
| | | |
| | १.३.११ | व्यक्ति, संस्था किंवा ट्रॅक्टर्स, बुलडोझर्स, वेल-बोअरिंग उपकरणे, थ्रेशर्स, कंबाइन्स वगैरेंचा ताफा बाळगणाऱ्या संधटनानी व्यवस्थापित केलेल्या आणि कंत्राटी तत्त्वावर शेतकऱ्यांसाठी काम हाती घेणाऱ्या कस्टम्स सर्व्हिस युनीटसना अग्रिमे. |
| | | |
| | १.३.१२ | ठिबक सिंचन/फवारा सिंचन यंत्रणा/शेतीसाठी यंत्रसामग्री यांच्या डिलर्सना, त्यांच्या ठिकाणाचा विचार न करता, खालील अटींच्या अधीन केलेला वित्तपुरवठा. |
| | | |
| | | (अ) डिलर केवळ याच वस्तूंमध्ये व्यवहार करणारा असावा किंवा जर अन्य वस्तूत व्यवहार करीत असेल तर त्याने असा वस्तूंच्या बाबतीत स्वतंत्र आणि वेगळ्या नोंदी ठेवलेल्या असाव्यात. |
| | | (ब) प्रति डिलर रु. ३० लाखाच्या मर्यादेचे पालन करावे. |
| | | |
| | १.३.१३ | निविष्टीच्या पुरवठ्यासाठी किंवा शेतकऱ्याकडून व्यक्तिशः/एसएचजीजकडून/जेएलजीजकडून उपज विकत घेण्यासाठी शेतकऱ्याना कर्ज देण्यासाठी अर्थियाना (ग्रामीण/अर्धग्रामीण भागात बाजार/मंडयात काम करणारे कमिशन एजन्ट) कर्जे. |
| | | |
| | १.३.१४ | जनरल क्रेडीट कार्डस(जीसीसी) खालील सर्वसाधारण हेतूअधीन कर्जाखालील थकित क्रेडीटच्या ५० टक्के. |
| | | |
| | १.३.१५ | प्राधान्य क्षेत्रातील कर्जपुरवठ्याची लक्ष्ये/उपलक्ष्ये पूर्ण न केल्याबद्दल बँकांनी नाबार्डकडे आरआयडीफमध्ये ठेवलेल्या आणि एप्रिल ३०, २००७ रोजी असल्याप्रमाणे थकित असलेल्या ठेवी अशा ठेवींची मुदतपूर्तीची तारीख किंवा मार्च ३०, २०१० यापैकी जी आधी असेल तोपर्यंत शेती क्षेत्राला अप्रत्यक्ष वित्तपुरवठा म्हणून वर्गीकरणाला पात्र असतील. |
| | | |
| | १.३.१६ | एसइबीजच्या पुनर्रचनेच्या/विभाजनातून निर्माण झालेल्या राज्य विद्युत मंडळाना (एसइबीज) आणि विद्युत वितरण महामंडळाना/कंपन्याना त्यानी व्याक्तिगत शेतकऱ्याना त्यांच्या विहीरीना शक्तिप्रदान |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यासाठी आणि स्पेशल प्रोजेक्ट ॲग्रीकल्चर (एसआय-एसपीए) अधीन यंत्रणा सुधारणेसाठी स्टेप-डाउन पॉइंट पासून कमी दाबाच्या जोडण्या पुरवण्यासाठी त्यांनी आधीच केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी आधीच वाटप केलेली आणि एप्रिल ३०, २००७ रोजी असल्याप्रमाणे थकित असणारी कर्जे, त्यांची मुदतपूर्तीची/परतफेडीची तारीख किंवा मार्च ३१, २०१० यापैकी जी आधी असेल तोपर्यंत अप्रत्यक्ष वित्तपुरवठा म्हणून वर्गीकरणास पात्र असतील. नवीन अग्रिमे मात्र, शेतीला अप्रत्यक्ष वित्तपुरवठा म्हणून वर्गीकरणास पात्र नसतील. |
| | | |
| | **१.३.१७** | नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेवलपमेंट कॉर्पोरेशन (एनसीडीसी) ला पुढे सहकारी क्षेत्राला प्राधान्य क्षेत्राखाली येणाऱ्या हेतूसाठी कर्जे देण्यासाठी दिलेली कर्जे मार्च ३१, २०१० पर्यंत शेतीला अप्रत्यक्ष वित्तपुरवठा समजण्यात येतील. |
| | | |
| | **१.३.१८** | शेतकऱ्यांना व्यक्तिशः किंवा त्यांच्या एसएचजीज/जेएलजीज ना पुढे कर्जे देण्यासाठी नॉन-बँकिंग फाइनॅन्शियल कंपन्यांना (एलबीएफसीज) कर्जे. |
| | | |
| | **१.३.१९** | शेतकऱ्यांना व्यक्तिशः किंवा त्यांच्या एसएचजीज/जेएलजीज ना पुढे कर्जे देण्यासाठी एनजीओज/एमएफआयज ना मंजूर केलली कर्जे. |
| | | |
| २ | **लघु उद्यम** | |
| | | |
| **प्रत्यक्ष वित्तपुरवठा** | | |
| | | |
| **२.१ लघु उद्यम क्षेत्राला प्रत्यक्ष वित्तपुरवठ्यात पुढील क्षेत्राला क्रेडीट समाविष्ट असेलः** | | |
| **२.१.१ निर्मिती उद्यम** | | |
| **(अ) लघु (निर्मिती) उद्यम** | | |
| मालाची निर्मिती/उत्पादन, प्रक्रिया किंवा संवर्धनात व्यस्त असलेल्या आणि ज्यांची यंत्रसामग्री आणि संयंत्रे (जमीन आणि इमारत यांची आणि लघु उद्योग मंत्रालयाने आपल्या अधिसूचना क्र. एस.ओ. १७२२ (इ) दिनांक ऑक्टोबर ५, २००६ अन्वये विनिर्दिष्टीत केलेल्या बाबींची किंमत वगळता मूळ किंमत) यातील गुंतवणूक रु. ५ कोटींच्या वर नाही असे उद्यम. | | |
| | | |
| **(ब) मायक्रो(निर्मिती) उद्यम** | | |
| | | |
| **२.१.२ सेवा उद्योग** | | |
| | | |
| **(अ) लघु (सेवा) उद्योग** | | |
| सेवा देण्यात/पुरवण्यात व्यस्त असलेले आणि ज्यांची उपकरणातील (जमीन आणि इमारत आणि फर्निचर, फिटिंग्स आणि पुरविण्यात येणाऱ्या सेवेशी थेट संबंधित नसणाऱ्या अन्य बाबी किंवा एमएसएमइडी अधिनियम, २००६ अधीन अधिसूचित करण्यात येईल त्याप्रमाणे बाबींची किंमत | | |

वगळता मूळ किंमत) रु. २ कोटींच्या वर नाही, असे उद्योग.

**(ब) मायक्रो (सेवा) उद्योग**

सेवा देण्यात/पुरवण्यात व्यस्त असलेले आणि ज्यांची उपकरणातील (जमीन आणि इमारत आणि फर्निचर, फिटिंग्स आणि २.१.२ प्रमाणे असलेल्या बाबींची किंमत वगळता मूळ किंमत) रु. १० लाखांच्या वर नाही, असे उद्योग.

**(क)** लघु आणि मायक्रो (सेवा) उद्योगात लहान रस्ता आण जल वाहतूक प्रचालक, छोटे व्यवसाय, व्यावसायिक आणि स्वयंरोजगारी व्यक्ति आणि अन्य सर्व सेवा उद्योगांचा समावेश असेल.

**२.१.३ खादी आणि ग्रामोद्योग क्षेत्र (केव्हीआय)**

प्राचालनाचा आकार, स्थान आणि यंत्रसामग्री आणि संयंत्रे यातील मूळ गुंतवणूक विचारात न घेता, केव्हीआय क्षेत्रातील युनीटसना मंजूर केलेली सर्व अग्रिमे. अशी अग्रिमे प्राधान्य क्षेत्रांतर्गत लघु उद्योग विभागाच्या उपलक्ष्याधीन (६० टक्के) विचारासाठी पात्र असतील.

**अप्रत्यक्ष वित्तपुरवठा**

**२.२ लघु उद्योगांना(निर्मिती त्याचप्रमाणे सेवा) अप्रत्यक्ष वित्तपुरवठ्यात खालील क्रेडीट समाविष्ट असेलः**

**२.२.१** कारागीर, ग्रामीण आणि कुटीरोद्योग याना निविष्टीच्या पुरवठा आणि त्यांच्या उत्पादनांचे विपणन यात विकेंद्रित क्षेत्राला सहाय्य करण्यात व्यस्त असलेल्या व्यक्ति.

**२.२.२** विकेंद्रित क्षेत्रातील उत्पादकांच्या म्हणजेच कारागीर ग्रामीण आ्णि कुटीरोद्योग सहकारी संस्थांना अग्रिमे.

**२.२.३** मार्च ३१, २००७ रोजी असल्याप्रमाणे नाबार्डने केवळ नॉन-फार्म क्षेत्राला वित्तपुरवठा करण्याच्या हेतूने निग्रमित केलेल्या विशेष रो़ख्यात बँकानी केलेली गुंतवणूक, अशा रोख्यांची मुदतपूर्तीची तारीख किंवा मार्च ३१, २०१० यापैकी जी आधी असेल तोपर्यंत लघु उद्योगांना अप्रत्यक्ष वित्तपुरवठा म्हणून वर्गीकरणास पात्र असतील. परंतु मार्च ३१, २००७ नंतर अशा विशेष रोख्यात केलेली गुंतवणूक मात्र अशा वर्गीकरणास पात्र नसेल.

**२.२.४** भारतात कार्यालय असलेल्या विदेशी बँकांनी प्राधान्य क्षेत्राला कर्ज पुरवठ्याची लक्ष्ये/उपलक्ष्ये गाठण्यातील उणीवेपोटी सिडबीकडे ठेवलेल्या आणि एप्रिल ३०, २००७ रोजी असल्याप्रमाणे थकित असलेल्या ठेवी अशी ठेवींची मुदतपूर्तीची तारीख किंवा मार्च ३१, २०१० यापैकी जी आधी असेल तोपर्यंत लघु उद्योगांना अप्रत्यक्ष वित्तपुरवठा म्हणून वर्गीकरणास पात्र असतील.

**२.२.५** एनबीएफसीजना पुढे लघु आणि मायक्रो उद्योगांना (निर्मिती त्याचप्रमाणे सेवा) कर्जे देण्यासाठी बँकांनी दिलेली कर्जे.

**३. किरकोळ व्यापार**

| |
|---|
| **३.१** अत्यावश्यक वस्तूंचा व्यवहार करणाऱ्या (उचित दर दुकाने) किरकोळ व्यापाऱ्याना, ग्राहक सहकारी संस्था मंजूर केलेली अग्रिमे आणि |
| **३.२** खाजगी किरकोळ व्यापाराना रु. २० लाखाच्या वर क्रेडीट मर्यादा नसलेली मंजूर केलेली अग्रिमे. |
| **४. मायक्रो क्रेडीट** |
| **४.१** रु. ५०००० पेक्षा अधिक नसलेली अतिशय छोट्या रकमेची कर्जे जर ती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे एसएचजी/जेएलजी यंत्रणेमार्फत बँकानी पुरविली असतील किंवा एनएफबीसी/एमएफआयना पुढे कर्ज देण्यासाठी प्रति ऋणको रु. ५०००० पर्यंत. |
| **४.२** अनौपचारिक क्षेत्राचे देणेकरी असलेल्या गरिबाना कर्जे |
| आपत्तीग्रस्त व्याक्तिना (शेतकऱ्यांव्यत्रिक्त) त्यांची बिगर-संस्थात्मक सावकारांची ऋणे परतफेड करण्यासाठी, उचित सांपार्श्विक किंवा समूह सुरक्षेच्या समक्ष कर्जे प्राधान्य क्षेत्राखाली कर्जे म्हणून वर्गीकरणास पात्र असतील. |
| **५.** अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींसाठी शासन प्रायोजित संधटना |
| अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींसाठी शासन प्रायोजित संधटनाना ह्या संघटनांच्या लाभार्थींना निविष्टीच्या पुरवठ्यासाठीच्या आणि/किंवा त्यांच्या उत्पादनांच्या विपणनासाठी मंजूर केलेली अग्रिमे. |
| **६. शिक्षण** |
| **६.१** शैक्षणिक हेतूने व्याक्तिना भारतातील शिक्षणासाठी रु. १० लाखांपर्यंत आणि विदेशातील शिक्षणासाठी रु. २० लाखांपर्यंत मंजूर केलेली शैक्षणिक कर्जे. संस्थाना मंजूर केलेली कर्जे प्राधान्य क्षेत्राला कर्जे म्हणून वर्गीकरणास पात्र नसतील. |
| **६.२** भारतातील शिक्षणासाठी रु. १० लाखांपर्यंत आणि विदेशातील शिक्षणासाठी रु. २० लाखांपर्यंत पुढे व्याक्तिना कर्जे देण्यासाठी बँकानी एनबीएफसीजना बँकानी मंजूर केलेली कर्जे. |
| **७. गृहनिर्माण** |
| **७.१** ठिकाणाचा विचार न करता, प्रति कुटुंब निवासस्थानाच्या खरेदी/बांधकामासाठी व्याक्तिना, बंकेने आपल्या कर्मचाऱ्याना मंजूर केलेली कर्जे वगळता, रु. २० लाखांपर्यंतची कर्जे. |
| **७.२** कुटुंबाच्या पडझड झालेल्या घराच्या दुरुस्तीसाठी ग्रामीण आणि अर्धनागरी भागात रु. १ लाखांपर्यंत आणि नागरी आणि महानगरी भागात रु. २ लाखांपर्यंत मंजूर केलेली कर्जे. |

| |
|---|
| **७.३** निवासस्थानांच्या उभारणीसाठी किंवा झोपडपट्टी निर्मूलनासाठी आण झोपडपट्टीवासींच्या पुनर्वसनासाठी कोणत्याहि सरकारी एजन्सीला, प्रति निवासस्थान रु. ५ लाखाच्या कर्ज रकमेच्या मर्यादेधीन दिलेले सहाय्य. |
| |
| **७.४** एनएचबीने मान्यता दिलेल्या बिगर-सरकारी एजन्सीला निवासस्थानांच्या उभारणीसाठी/पुनर्उभारणीसाठी किंवा झोपडपट्टी निर्मूलनासाठी आणि झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी प्रति निवासस्थान रु. ५ लाखाच्या कर्ज घटकाच्या मर्यादेधीन दिलेले सहाय्य. |
| |
| **८. कमकुवत गट** |
| |
| प्राधान्य क्षेत्रातील कमकुवत गटात खालीलप्रमाणे समावेश असेलः |
| (अ) ५ आणि त्यापेक्षा कमी एकर भूधारक मार्जिनल आणि छोटे शेतकरी, भूमीहीन मजूर, कुळ शेतकरी आणि पीक कापणीचे वाटेकरी, |
| (ब) कारागीर आणि येथे वैयक्तिक क्रेडीट मर्यादा रु. ५०,००० च्या वर नाही असे ग्रामीण आणि कुटीरोद्योग, |
| (क) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (एसजीएसवाय) चे लाभार्थी, |
| (ड) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती |
| (इ) डिफरंशियल रेट ऑफ इंटरेस्ट (डीआरआय) योजनेचे लाभार्थी |
| (फ) स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (एसजेएसआरवाय) अधीन लाभार्थी |
| (ग) मेहतरांची मुक्ती आणि पुनर्वसनासाठी योजनेअधीन लाभार्थी |
| (ह) स्वमदत गटांना अग्रिमे |
| (य) आपत्तीग्रस्त गरिबांना त्यांच्या अनौपचारिक क्षेत्रातील कर्जाच्या परतफेडीसाठी, उचित सांपार्श्विक किंवा गट सुरक्षेच्या समक्ष कर्जे, |
| (ज) भारत सरकारने वेळोवेळी अधिसूचित केल्याप्रमाणे अल्पसंख्य समुदायातील व्यक्तिंना उक्त (अ) ते (य) अधीन मंजूर केलेली कर्जे.<br>ज्या राज्यात, अधिसूचित केलेला समुदाय हा वस्तुतः बहुसंख्य आहे, बाब (जे) केवळ अन्य अधिसूचित समुदायांना लागू होईल. ही राज्ये/केंद्रशासित प्रदेश म्हणजे जम्मू आणि काश्मीर, पंजाब, सिक्कीम, मिझोराम, नागालँड आणि लक्षद्वीप आहेत. |
| |
| **९. निर्यात क्रेडीट** |
| |
| हा प्रवर्ग केवळ विदेशी बँकांसाठी प्राधान्य क्षेत्राचा हिस्सा असेल. |

| | |
|---|---|
| | **खंड २** |
| | |
| **प्राधान्य क्षेत्रातील कर्जाची लक्ष्ये/उपलक्ष्ये प्राप्त न केल्याबद्दल दंड** | |
| | |
| १. | **स्थानिक अनुसूचित व्यावसायिक बँका - रूरल इंफ्रास्ट्रक्चर डेवलपमेंट फंड(आरआयडीएफ) ला अंशदानः** |
| | |
| | **१.१** प्राधान्य क्षेत्राला(एएनबीसीच्या ४० टक्के किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या रकमेच्या सममूल्य क्रेडीट यापैकी जे अधिक असेल) आणि/किंवा शेतीसाठी(एएनबीसीच्या १८ टक्के किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या रकमेच्या सममूल्य क्रेडीट यापैकी जे अधिक असेल) कर्जे देण्याच्या लक्ष्यात तूट असणाऱ्या स्थानिक व्यावसायिक बँकांना नाबार्डमध्ये स्थापन करण्यात आलेल्या रूरल इंफ्रास्ट्रक्चर डेवलपमेंट फंड(आरआयडीफ) मध्ये अंशदानाची रक्कम ठरवून देण्यात येईल. आरआयडीएफ ट्रँचेच्या वाटपाच्या हेतूने, लगेचच्या आधीच्या आर्थिक वर्षातील मार्चच्या शेवटच्या अहवालाच्या शुक्रवारी असल्याप्रमाणे प्राधान्य क्षेत्राला कर्ज देण्यातील प्राप्तीचा स्तर विचारात घेतला जाईल. विविध राज्यांकडून मागणी आल्यावर, नाबार्ड संबंधित बँकेला आरआयडीएफला अंशदान करण्यासाठी बोलावून घेईल. |
| | |
| | **१.२** आरायडीएफच्या विशिष्ट ट्रँचेचा निधी प्रत्येक वर्षी भारत सरकार निश्चीत करील. निधीच्या ५० टक्के, एएनबीसीच्या ४० टक्के किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या रकमेच्या सममूल्य क्रेडीट यापैकी जे अधिक असेल त्या प्राधान्य क्षेत्राला कर्ज देण्यातील तूटीपोटी, यथाप्रमाण तत्त्वावर स्थानिक व्यावसायिक बँकांमध्ये वाटून देण्यात येईल. निधीचा शेष ५० टक्के, एएनबीसीच्या १८ टक्के किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या रकमेच्या सममूल्य क्रेडीट यापैकी जे अधिक असेल त्या शेतीला कर्ज देण्यातील तूटीपोटी, यथाप्रमाण तत्त्वावर बँकामध्ये वाटून देण्यात येईल. आरआयडीएफच्या विशिष्ट ट्रँचेला बँकांच्या अंशदानाची रक्कम वित्तीय वर्षाच्या सुरवातीस ठरवली जाईल. |
| | **१.३** आरआयडीएफला बँकांच्या अंशदानावरील व्याजाचा दर भारतीय रिझर्व्ह बँक वेळोवेळी निश्चीत करील. |
| | |
| | **१.४** बँकांनी जमा करायची रक्कम, ठेवीवरील व्याजाचा दर, ठेवीचा कालावधी वगैरे आरआयडीएफच्या प्रचालनाविषयीचा तपशील, संबंधित बँकाना त्यांच्या निधीच्या तैनातीची योजना करणे शक्य व्हावे म्हणून प्रत्येक वर्षाच्या ऑगस्टमध्ये स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |
| | |
| २. | **विदेशी बँका - विदेशी बँकांनी सिडबीकडे ठेवायच्या ठेवी** |
| | |
| २.१ | ठरवून दिलेल्या प्राधान्य क्षेत्र लक्ष्यांच्या/उपलक्ष्यांच्या प्राप्तीतील उणीवेपोटी विदेशी बँकांनी स्मॉल इंडस्ट्रीज डेवलपमेंट बँक ऑफ इंडियाने स्थापन करायच्या स्मॉल एंटरप्राइझेस डेवलपमेंट फंडाला(एसइडीफ) किंवा भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अन्य कोणत्याहि अशा हेतूला अंशदान करणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| २.२ | अशा वाटपांच्या हेतूने, लगेचच्या आधीच्या आर्थिक वर्षाच्या मार्चच्या शेवटच्या अहवाल शुक्रवारी असल्याप्रमाणे प्राधान्य क्षेत्राला कर्ज देण्याच्या लक्ष्यप्राप्तीचा विचारात घेण्यात येईल. |
| | |
| २.३ | एसइडीएफचा कॉर्पस भारतीय रिझर्व्ह बँक वर्षागणिक निश्चीत करील. ठेवींचा कालावधी तीन वर्षांचा किंवा भारतीय रिझर्व्ह बँक वेळोवेळी निश्चीत करील त्याप्रमाणे असेल. कॉर्पसच्या ५० टक्के निधी एएनबीसीच्या ३२ टक्के किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य क्रेडीट रक्कम, यापैकी जी अधिक असेल, प्राधान्य क्षेत्राला कर्जे देण्याच्या लक्ष्यात असलेल्या तूटीसाठी विदेशी बँका यथाप्रमाणे अंशदान करतील. कॉर्पसचा शेष ५० टक्के निधी, यापैकी जी अधिक असेल, स्मॉल एंटरप्राइझेस क्षेत्र आणि निर्यात क्षेत्र यांना एएनबीसीच्या किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य क्रेडीट रकमेच्या अनुक्रमे १० टक्के आणि १२ टक्के, यापैकी जी अधिक असेल, त्यातील कर्ज देण्यातील तूटीपोटी, यथाप्रमाणे अंशदान करतील. तथापि, विदेशी बँकानी करणे आवश्यक असलेले अंशदान, विदेशी बँकांसाठी प्राधान्य क्षेत्राला कर्जे देण्याच्या लक्ष्यांच्या/उपलक्ष्यांच्या प्राप्तीतील तूटीपेक्षा अधिक नसेल. |
| | |
| २.४ | संबंधित विदेशी बँकेला सिडबी/किंवा अन्य अशाच भारतीय रिझर्व्ह बँकेने ठरविलेल्या संस्थेकडून जेव्हा केव्हा त्यांना निधीची आवश्यकता असेल तेव्हा एक महिंन्याची सूचना दिल्यानंतर बोलावण्यात येईल. |
| | |
| २.५ | विदेशी बँकांच्या अंशदानावरील व्याजाचा दर, ठेवीचा कालावधी वगैरे भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे वेळोवेळी निश्चीत करण्यात येईल. |
| | |
| ३. | प्राधान्य क्षेत्राला कर्ज देण्याच्या लक्ष्यातील आणि उपलक्ष्यातील उणीवा विविध हेतूंसाठी नियामक निपटारे/ मंजूऱ्या देताना विचारात घेतली जाईल. |
| | |

| खंड ३ | |
|---|---|
| | |
| **प्राधान्य क्षेत्राला अग्रिमांसाठी सामान्य मार्गदर्शक तत्त्वे** | |
| | |
| **१.** | बँकांनी प्राधान्य क्षेत्राखालील अग्रिमांच्या सर्व प्रवर्गांसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने विहीत केलेल्या खालील सामान्य मार्गदर्शक तत्त्वांचे अनुसरण करावे. |
| | |
| २. | **अर्जांची प्रक्रिया** |
| | |
| **२.१** | **अर्जांची प्रपत्रे पूर्ण करणे** |
| | एसजीएसवाय सारख्या सरकार प्रयोजित योजनांच्या बाबतीत, डीआरडीएज, डीआयसीज वगैरे सारख्या संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यानी ऋणकोकडून प्राप्त झालेली अर्जाची प्रपत्रे पूर्ण करण्यासाठी व्यवस्था करावी. इतर भागात, बँक कर्मचाऱ्यांनी या बाबतीत ऋणकोंना मदत करावी. |
| | |
| २.२ | **कर्जाच्या अर्जाची पोचपावती देणे** |
| | बँकांनी कमकुवत गटाकडून प्राप्त झालेल्या कर्जासाठी अर्जाची पोचपावती द्यावी. ह्या हेत्वर्थ, कर्जासाठी अर्ज प्रपत्रांना स्वीकृती बँकांनी पूर्ण करण्यासाठी आणि देण्यासाठी, छिद्रांकित पोचपावतीचा भाग असेल ह्याची खात्री करावी. प्रत्येक शाखेने मुख्य अर्जावर तसेच तदनुरूप पोचपावतीवर धावता अनुक्रमांक टाकावा. पोचपावती देण्यासाठी छिद्रांकित भाग नसलेल्या विद्यमान अर्जांचा उपयोग करताना, पोचपावतीवर दिलेला अनुक्रमांक मुख्य अर्जावरहि नोंदला जाईल ह्याची काळजी घ्यावी. कर्जाच्या अर्जाबरोबर संभाव्य ऋणकोने सादर करणे आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी सूची असावी. |
| | |
| **२.३** | **अर्जांची विल्हेवाट** |
| | (१) रु. २५,००० च्या क्रेडीट मर्यादपर्यंतचे सर्व कर्जाचे अर्ज पंधरवड्याच्या आत आणि रु. २५,००० च्या वरील अर्ज ८ ते ९ आठवड्याच्या आत निकालात काढावेत.<br>(२) कर्जासाठी अर्ज सर्व दृष्टीने परिपूर्ण असतील आणि त्यांच्या तपासणी सूची जोडलेली असेल तर, लघु उद्योगाचे रु. २५,००० च्या क्रेडीट मर्यादेपर्यंतचे सर्व अर्ज २ आठवड्यात आणि रु. ५ लाखांपर्यंतचे अर्ज ४ आठवड्यात निकालात काढावेत. |
| | |
| **२.४** | **प्रस्ताव फेटाळणे** |
| | फेटाळलेले अर्ज असे फेटाळणे नंतर खंडीय/विभागीय व्यवस्थापकांनी पडताळून पाहण्याच्या अधीन शाखा व्यवस्थापक अर्ज फेटाळू शकतो (अजा/अज च्या बाबी वगळता). अजा/अजच्या बाबतीत असे फेटाळणे शाखा व्यवस्थापकापेक्षा अधिक वरच्या पातळीवर व्हावे. |
| **२.५** | **फेटाळलेल्या अर्जांची नोंदवही** |

| | |
|---|---|
| | शाखेत एक नोंदवही ठेवण्यात यावी, ज्यात प्राप्त झाल्याची तारीख, मंजूरी/फेटाळणे/वाटप करणे त्याच्या कारणासह, वगैरेची नोंद करावी. ही नोंदवही सर्व निरीक्षक एजन्सीजना उपलब्ध करण्यात यावी. |
| | |
| ३ | **कर्जाच्या वाटपाची पध्दत** |
| | शेतकऱ्यांना अधिक विस्तृत पर्याय उपलब्ध व्हावेत त्याचप्रमाणे अयोग्य पद्धती टाळता याव्यात ह्या दृष्टीने, बँकांना शेतीच्या हेतूसाठी वाटप करण्यात येणारी सर्व कर्जे रोख वाटप करता येतील ज्यामुळे ऋणकोला डिलर निवडण्याचा पर्याय उपलब्ध होईल आणि विश्वासाचे वातावरण निर्माण होईल. परंतु, बँकांनी ऋणकोकडून पावती प्राप्त करण्याची पद्धत चालू ठेवता येईल. |
| | |
| ४ | **परतफेडीचा कार्यक्रम** |
| | |
| ४.१ | परतफेडीचा कार्यक्रम आखताना तो तदर्थ पध्दतीने न आखता, टिकून राहण्यासाठी गरजा, अधिकांश निर्माण करण्याची क्षमता, ब्रेक-इव्हन पॉइंट, मत्तेचे आयुष्य वगैरे बाबी विचारात घ्याव्यात. संयुक्त कर्जांच्या बाबतीत, परतफेडीचा कार्यक्रम केवळ मुदत कर्ज घटकासाठी आखावा. |
| | |
| ४.२ | नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित लोकांची परतफेडीची क्षमता आर्थिक ओढाताण आणि आर्थिक मत्तेला झालेल्या नुकसानामुळे मोठ्या प्रमाणावर घटते, त्यामुळे आमच्या परिपत्रक आरपीसीडी.सीओ.पीएलएफएस.क्र. बीसी १६/०५.०४.०२/२००६-०७ दिनांक ऑगस्ट ९, २००६ अन्वये समोर ठेवलेल्या, विद्यमान कर्जाची पुनर्रचना करणे, वगैरे लाभ बाधित ऋणकोंना देण्यात यावेत. |
| | |
| ५ | **व्याजाचा दर** |
| | |
| ५.१ | प्राधान्य क्षेत्राला अग्रिमांच्या विविध प्रवर्गांसाठी व्याजाचे दर वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आरबीआयच्या आदेशांप्रमाणे असतील. |
| | |
| ५.२ | (अ) प्रत्यक्ष शेती कर्जाच्या बाबतीत, बँकांनी चालू देय रकमांसाठी म्हणजे पीक कर्जे आणि मुदत कर्जाच्या बाबतीत देय न झालेले हप्ते, ह्या बाबतीत संचायित व्याज आकारू नये कारण शेतकऱ्यांना त्यांच्या पीकाच्या विक्रीशिवाय अन्य कोणताहि उत्पन्नाचा स्रोत नसतो. |
| | |
| | (ब) जेव्हा पीक कर्ज आणि मुदत कर्जाखालील हप्ते थकित होतात, तेव्हा बँकांनी मुद्दलावर व्याज आकारावे. |
| | |
| | (क) जेथे कसूर ही वास्तव कारणाने असेल तेथे बँकांनी कर्जाचा कालावधी वाढवावा किंवा मुदत कर्जाखालील हप्त्यांची पुनर्रचना करावी. एकदा असे सहाय्य केल्यानंतर, थकित रक्कमा चालू येणे असलेल्या रक्कमा होतात आणि बँकानी व्याज चक्रवाढ (परिणामगमन) करू नये. |
| | |

| | |
|---|---|
| | (ड) बँकांनी दीर्घकालीन पीकांच्या बाबतीत शेती अग्रिमांवर, त्रैमासिक किंवा अधिक लांबीच्या कालावधीपेक्षा वार्षिक अंतराने व्याज आकारावे, आणि कर्ज/हप्ते थकित झाल्यास त्यांना व्याज संचयित करता येईल. |
| | |
| ६. | **दंडनीय व्याज** |
| | |
| | **६.१.१** परतफेडीतील कसूर, आर्थिक विवरणपत्रे सादर न करणे वगैरे कारणांसाठी दंडनीय व्याज आकारण्याचा विषय प्रत्येक बँकेच्या संचालक मंडळावर सोडण्यात आला आहे. बँकांनी त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजूरीने, पारदर्शकता, उचितता, ऋणांच्या सेवेला उपकारक आणि ग्राहकांच्या योग्य अडचणींचा योग्य विचार करून असा दंडनीय व्याजाच्या आकारणीसाठी धोरण आखावे असे त्यांना कळविण्यात आले आहे. |
| | |
| | **६.१.२** बँकांनी आतापर्यंत असल्याप्रमाणे, रु. २५,००० पर्यंतच्या प्राधान्य क्षेत्राखालील कर्जांसाठी दंडनीय व्याज आकारू नये. परंतु, उक्त मार्गदर्शक तत्त्वांनुसार रु. २५,००० च्या वरील कर्जांसाठी दंडनीय व्याज आकारण्यास बँका मुक्त आहेत. |
| | |
| ७. | **सेवा आकार/निरीक्षण आकार** |
| | **७.१.१** प्राधान्य क्षेत्राखालील रु. २५,००० पर्यंतच्या कर्जासाठी कोणताहि सेवा आकार/निरीक्षण आकार लावू नये. |
| | |
| | **७.१.२** रु. २५,००० च्या वरील कर्जांसाठी आमच्या परिपत्रक क्र. डीबीओडी.डायर.बीसी.८६/०३.०१.००/९९-२००० दिनांक सप्टेंबर ७, १९९९ च्या अटीनुसार, त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजूरीने सेवा आकार विहित करण्यास मुक्त आहेत. |
| | |
| ८. | **आग आणि इतर जोखमींसमक्ष विमा संरक्षण** |
| | |
| ८.१ | खालील प्रकरणात, बँक क्रेडीट द्वारे वित्तपुरवठा केलेल्या मत्तांच्या बाबतीत बँका विमा माफ करू शकतात. |
| | |

| **क्र.** | **प्रवर्ग** | **जोखमीचा प्रकार** | **मत्तेचा प्रकार** |
|---|---|---|---|
| **(अ)** | रु. १०,००० पर्यंतच्या आणि सह प्राधान्य क्षेत्रातील अग्रिमांचे सर्व प्रवर्ग | आग आणि इतर जोखमी | उपकरणे आणि चालू मत्ता |
| **(ब)** | खालील मार्गाने एसएसआय क्षेत्राला रु. २५,००० पर्यंत आणि सह अग्रिमे | | |
| | • कारागीर, ग्रामीण आणि कुटीरोद्योगाना संयुक्त कर्जे | आग | उपकरणे आणि चालू मत्ता |
| | • सर्व मुदत कर्जे | आग | उपकरणे |
| | • घातक नसलेल्या मालासमक्ष असेल तेथे खेळते भांडवल | आग | चालू मत्ता |
| | | | |

| | |
|---|---|
| ८.२ | परुंतु, जेथे, कोणत्याहि कायद्याच्या तरतूदीखाली किंवा जेथे पुनर्वित्तपुरवठा करणाऱ्या एजन्सीच्या पुनर्वित्तपुरवठा योजनेत ठरवून दिल्यामुळे किंवा एसजीएसवायसारख्या सरकार प्रायोजित योजनांचा एक भाग म्हणून वाहनाचा किंवा यंत्रसामग्रीचा किंवा अन्य उपकरणांचा/मत्तेचा विमा सक्तीचा आहे, संबंधित क्रेडीट सुविधा रु. १०,००० किंवा रु. २५,०००, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, असली तरी माफ करण्यात येऊ नये. |
| | |
| ९. | **ऋणकोंची छायाचित्रे** |
| | ओळख पटविण्याच्या हेतूने ऋणकोंची छायाचित्रे घेण्यास कोणतीहि हरकत नसली तरी, बँकांनी अशी छायाचित्रांची व्यवस्था स्वतः करावी आणि कमकुवत गट प्रवर्गात मोडणाऱ्या ऋणकोंच्या छायाचित्रांसाठी येणारा खर्चहि उचलावा. ह्याचीहि काळजी घ्यावी कि त्यामुळे कर्ज वाटपात कोणतीहि दिरंगाई होणार नाही. |
| | |
| १०. | **स्वेच्छानिर्णयाचे अधिकार** |
| | बँकांच्या सर्व शाखा व्यवस्थापकांना कमकुवत गटांकडील प्रस्ताव वरिष्ठ अधिकाऱ्यांना संदर्भित न करता मंजूर करण्यासाठी स्वेच्छानिर्णयाचे अधिकार प्रत्यायोजित करावेत. जर सर्व शाखा व्यवस्थापकांना असे अधिकार प्रत्ययोजित करण्यात काही अडचणी असतील तर असे अधिकार किमान जिल्हा स्तरावर असावेत आणि कमकुवत गटांचे क्रेडीट प्रस्ताव तत्परतेने मंजूर केले जातील ह्याची खात्री करावी. |
| | |
| ११. | **तक्रारीत लक्ष घालण्यासाठी यंत्रणा** |
| | |
| | **११.१.१** शाखा ह्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करीत नाहीत अशी तक्रार ऋणकोंकडून आल्यास तिचा पाठपुरावा करण्यासाठी आणि शाखांद्वारे ह्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन केले जात आहे ह्याची नियतकालाने पडताळणी करण्यासाठी विभागीय कार्यालयात एक यंत्रणा असावी. |
| | |
| | **११.१.२** ज्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल करता येतील त्यांची नावे आणि पत्ते प्रत्येक शाखेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावीत. |
| | |
| १२ | **दुरुस्त्या** |
| | ही मार्गदर्शक तत्त्वे आरबीआयकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या कोणत्याहि सूचनांच्या अधीन आहेत. |

**परिशिष्ट**

**महापरिपत्रक**
**प्राधान्य क्षेत्राला कर्जे देणे**
**महापरिपत्रकात एकत्रित करण्यात आलेल्या परिपत्रकांची सूची**

| **क्र.** | **परिपत्रक क्र.** | **तारीख** | **विषय** | **परिच्छेद क्र.** |
|---|---|---|---|---|
| १. | आरपीसीडी.प्लॅन.बीसी.क्र. १०८५६/०४.०९.०१/२००६-०७ | १८.०५.०७ | प्राधान्यता क्षेत्राला –कमकुवत गट – कर्जे देण्याबाबत सुधारित मार्गदर्शक तत्त्वे | I. ८(१) |
| २. | आरपीसीडी.प्लॅन.बीसी.क्र. ८४/०४.०९.०१/२००६-०७ | ३०.०४.०७ | प्राधान्यता क्षेत्राला कर्जे देण्यावर मार्गदर्शक तत्त्वे - सुधारित | खंड I आणि II |
| ३. | आरपीसीडी.प्लॅन.बीसी.क्र. ५३/०४.०९.०१/२००२-०३ | २०.१०.०२ | प्राधान्यता क्षेत्राला कर्जावर बँकांनी सेवा आणि निरीक्षण आकार लावणे | III. ७.१.१, ७.१.२ |
| ४. | आरपीसीडी.प्लॅन.बीसी.क्र. २४/०६.०२.७७/२००२-०३ | ०४.१०.०२ | एसएसआयकडे क्रेडीटचा प्रवाह – कर्जासाठी अर्जांची विल्हेवाट लावण्यासाठी कालबध्द कार्यक्रम | III. २.३(II) |
| ५. | आरपीसीडी.प्लॅन.बीसी.क्र. १५/०४.०९.०१/२००१-०२ | १७.०८.२००१ | प्राधान्यता क्षेत्राला कर्जांवर बँकानी दंडनीय व्याज आकारणे. | IIII.६.१.१, ६.१.२ |
| ६. | आरपीसीडी.प्लॅन.बीसी.पीएल-०९.०१/८९-९० | १८.०१.९० | प्राधान्यता क्षेत्राला कर्जे – कर्जासाठी अर्ज प्रपत्रे | III. २.२ |
| ७. | आरपीसीडी.प्लॅन.बीसी.६७/ पीएस.२२/८७-८८ | १२.१२.८७ | प्राधान्यता क्षेत्राला अग्रिमे – कमकुवत गटातील अर्जदारांना पोचपावती देणे | III. २.२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | आरपीसीडी.प्लॅन.बीसी.६४/सी.५६८ए(पी)/८७-८८ | ०८.१२.८७ | आयआरडीपी-समान अर्ज प्रपत्रे – पोचपावती स्लीप देणे | |
| ९. | आरपीसीडी.प्लॅन.बीसी.२२/सी.६८२/८३-८४ | ०६.०२.८४ | प्राधान्यता क्षेत्राला अग्रिमांचे संनियंत्रण | --- |
| ११. | डीबीओडी.क्र.पीएस.बीसी.१२६/सी.४६४(एम)-८० | २९.१०.८० | प्राधान्यता क्षेत्राला कर्जे देण्याच्या अंमलबजावणीतील पध्दतीवर कार्यगटाचा अहवाल | --- |
| १२. | डीबीओडी.क्र.पीएस.बीसी.१७८/सी.४५३(यु)-७८ | २२.१२.७८ | डिफरंशियल रेट ऑफ इंटरेस्ट योजना | --- |
| १३. | डीबीओडी.क्र.पीएस.बीसी.१९००/सी.४५३(यु)-७८ | ०६.०७.७७ | डीआरआय योजना | --- |